# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## राज्यशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल  २०१९-२०२०

---

### १) विद्यार्थी चर्चासत्र:-

**दिनांक** 16 **ऑगस्ट** 2019 **रोजी राज्यशास्त्र विभागात विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. 'कलम 370 रद्द आणि जम्मु व कश्मीरचे विभाजन' हा चर्चासत्राचा विषय होता.  या महत्वपूर्ण विषयावर विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यात चर्चा घडवून आणण्याच्या दृष्टीने महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाने चर्चासत्र विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र घेतले या चर्चासत्रात** 12 **विद्यार्थी व दोन प्राध्यापक सहभागी झाले. यावेळी संबंधित विषयावर महत्त्वपूर्ण चर्चा घडून आली.**



भारतीय संविधानातील कलम 370 नुसार जम्मु आणि कश्मीर ला विशेष दर्जा देण्यात आला होता. भारत सरकारने कलम 370 रद्द करून जम्मू आणि काश्मिर या घटक राज्याचे विभाजन करून जम्मु आणि कश्मीर व लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण केले . भारत सरकारने 'जम्मू आणि काश्मिर पुनर्रचना अधिनियम २०१९' मंजूर करून त्याची अंमलबजावणी केली. दिनांक ५ ऑगस्ट २०१९ रोजी लोकसभेने तसेच दिनांक ६ ऑगस्ट २०१९ रोजी राज्यसभेने हा अधिनियम मंजूर केला.जम्मू आणि कश्मीर या या केंद्रशासित प्रदेशात २० जिल्हे समाविष्ट केले आणि लडाख या केंद्रशासित प्रदेशात दोन जिल्हे समाविष्ट केले.

## २) अतिथी व्याख्यान:-

शैक्षणिक वर्ष 2019 20 मध्ये पहिल्या सत्रात दिनांक 30 सप्टेंबर 2019 रोजी राज्यशास्त्र विभागात अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. व्याख्याते म्हणून प्राध्यापक सूर्यकांत सांभाळकर (विनायकराव पाटील महाविद्यालय कन्नड ) यांना निमंत्रित करण्यात आले होते त्यांनी नागरिकत्व आणि हक्क या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



## ३) संविधान दिन:-

**दिनांक** 26 **नोव्हेंबर** 2019 **हा दिवस भारतात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान दिन साजरा करण्यात आला. भारतीय संविधानासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन करण्यात आले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राचार्य व प्राध्यापक यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.**




## ४) महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती:-

**महाविद्यालयात दिनांक** 2 **ऑक्टोबर** 2019 **रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राज्यशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख व्याख्याते म्हणून संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील प्राचार्य डॉ.अशोक नाईकवाडे हे उपस्थित होते कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष टकले उपस्थित होते. व्याख्यानाच्या पूर्वी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ.अशोक नाईकवाडे यांनी**

महात्मा गांधींच्या विचारांची सद्यस्थितीत प्रासंगिकता या विषयावर आपले विचार मांडले. महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत,असे ते म्हणाले.






## ५) निबंध स्पर्धेचे आयोजन:-

**राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा गांधींच्या 150 व्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले दिनांक 14 सप्टेंबर 2019 रोजी निबंध स्पर्धेची सूचना काढण्यात आली. निबंध स्पर्धेचे विषय: महात्मा गांधीचा स्वच्छतेचा संदेश, महात्मा गांधीचे जीवन व कार्य, महात्मा गांधीचे शिक्षण विषयक विचार, महात्मा गांधी आणि आणि पर्यावरण संवर्धन, महात्मा गांधीचा सत्य आणि आणि अहिंसेचा विचार. आंतर महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात आलेल्या या निबंध स्पर्धेसाठी प्रथम पारितोषिक सातशे रुपये द्वितीय पारितोषिक पाचशे रुपये व तृतीय पारितोषिक तीनशे रुपये ठेवण्यात आले होते. दिनांक: २ ऑक्टोबर 2019 रोजी गांधी जयंती निमित्त उपस्थित प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ.अशोक नाईकवाडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष टकले यांच्या हस्ते निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.**





## ६) भित्तीपत्रक प्रकाशन:-

दिनांक: 2 ऑक्टोबर 2019 रोजी राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी बनविलेले प्रथम सत्रातील भित्तीपत्रक प्राचार्य अशोक नाईकवाडे व प्राचार्य सुभाष टकले यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. 'महात्मा गांधीजी का जीवनक्रम' असे या भीतीपत्रकाचे शीर्षक होते.



## ७) अभ्यास सहल:-

राज्यशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास सहल दिनांक : ६ फेब्रुवारी २०२० रोजी मध्यवर्ती कारागृह हर्सुल औरंगाबाद येथे काढण्यात आली. कारागृह प्रशासन व जेल व्यवस्थापन याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला. कैद्यांनी श्रमातून उत्पादित केलेल्या वस्तूंची माहिती घेतली.






## ८) अतिथी व्याख्यान:-

**शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील दुसऱ्या सत्रातील अतिथी व्याख्यान दिनांक:२७ फेब्रुवारी २०२० रोजी राज्यशास्त्र विभागात आयोजित करण्यात आले. व्याख्याते म्हणून प्रा. जी. एम. खाडप [देवगिरी महाविद्यालय औरंगाबाद] यांना निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी आंतरराष्ट्रीय प्रादेशिक संघटना या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**




## ९) भित्तीपत्रक प्रकाशन:-

**दिनांक: २७फेब्रुवारी २०२० रोजी अतिथी व्याख्याते प्रा. जी.एम. खाडप  यांच्या हस्ते राज्यशास्त्र विभागात भीतीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. 'भारतीय संविधान' या विषयावर विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रक बनविले होते.**




## १०) प्रकल्प सादरीकरण:-

**बी. ए. तृतीय वर्षाला राज्यशास्त्र मुख्य विषय घेतलेल्या आठ विद्यार्थ्यांचे विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाचे सादरीकरण दिनांक ६ मार्च २०२० रोजी बहिस्थ परीक्षक प्रा. किरण धनेधर यांच्यासमोर करण्यात आले.**

====